प्रकरण 4

मानसशास्त्रीय मापन/परीक्षण आणि व्यक्तिमत्व चाचण्या

(PSYCHOLOGICAL ASSESSMENT AND PERSONALITY TESTS)

प्रा. डॉ. भरत नाईक.
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

डॉ. राहुल गजानन कश्यप.
भोगावती महाविद्यालय, कुरुकली.

4.1 भावनिक बुद्धिमत्तेचे मापन (Measures of Emotional Intelligence)

4.2 व्यक्तिमत्व चाचण्या: अभिव्यक्ती आणि प्रक्षेपण तंत्रे (Personality Tests: Expression and Projective Techniques)

अ) अभिव्यक्ती तंत्रे (Expression Techniques)

i) व्यक्ति-रेखाटन चाचणी (The draw- A - Person test)

ii) घर-वृक्ष-व्यक्ति चाचणी (The House - Tree - Person Test, H-T-P)

ब) प्रक्षेपण तंत्रे (Projective Techniques)

i) रोर्शा यांची शाई – डाग चाचणी (Rorschach Ink Blot Test)

ii) रचनात्मक तंत्रे: चित्र अवबोधन चाचणी

(Construction techniques: Thematic Apperception Test- TAT)

4.3 सामान्यत्वाचे मापन (Assessment of normality)

अ) निओ व्यक्तिमत्व शोधिका - सुधारीत (NEO Personality Inventory- Revised- NEO PI- R)

ब) सोळा व्यक्तिमत्व घटक प्रश्नावली (Sixteen Personality Factor Questionnaire – 16 PF)

व्यक्तिमत्व मापनासाठी उपलब्ध असणाऱ्या साधनांसाठी विविधता पुरविण्याचे काम व्यक्तिमत्व सिद्धांत करतात. व्यक्तिमत्व चाचण्यांची रचना व त्यांच्या मूल्यांकन प्रक्रियेवर व्यक्तिमत्व संकल्पनेचा प्रभाव पडतो. जसे रोर्शा शाई डाग चाचणीचे उदाहरण घ्या. जिची निर्मिती सिग्मंड फ्रॉईड यांनी सांगितलेल्या व्यक्तिमत्व विषयक मनोविश्लेषणात्मक सिद्धांतातून झाली आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्व चाचण्यांविषयी जाणून घेण्याकरिता व्यक्तिमत्व या संकल्पनेविषयी थोडे जाणून घेणे उपयुक्त ठरेल.

व्यक्तिमत्व (personality)

व्यक्तिमत्व ही संकल्पना स्पष्ट करणे थोडे कठीणच आहे. पण दोन मूलभूत भेदांद्वारे या संकल्पनेतील फरक स्पष्ट होईल. जसे प्रत्येक व्यक्तीमध्ये काही घटकांबाबत **सुसंगती** दिसून येते. जसे आपणा सर्वांमध्ये विशिष्ट गुणवैशिष्ट्यांबाबत आणि कृतीसंघाताबाबत सुसंगती दिसून येते. तर दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक व्यक्तीमध्ये काही घटकांबाबत **विविधता** दिसून येते. जसे प्रत्येक व्यक्तीमध्ये वार्तनिक भेद दिसून येतात. जसे पदवी स्तरावर शिकत असलेल्या तीन विद्यार्थ्यांचे उदाहरण घ्या. ज्यांची नुकतीच परीक्षा झाली आहे. जवळपास या तिन्ही मुलांना समान गुण मिळाले आहेत. पण याबाबत प्रत्येकाची प्रतिक्रिया ही वेगवेगळी आहे. पहिला विद्यार्थी निराश होऊन संबंधित परीक्षा विभागास दोष देतो. दुसरा विद्यार्थी खूष होतो व मिळालेल्या गुणांनी समाधानी होतो. तर तिसरा विद्यार्थी निराश होतो व अभ्यास न करण्याबाबत स्वतःला दोष देतो. या तिन्ही मुलांच्या प्रतिक्रियांचा विचार केल्यास असा प्रश्न उपस्थित होतो की ही तिन्ही मुले एकाच उद्दीपकास प्रतिक्रिया देत आहेत का? कारण प्रत्येकाच्या प्रतिक्रियेमध्ये फरक दिसून येतो. वैयक्तिक दृष्ट्या व्यक्तिमत्त्वामध्ये दिसून येणारा हा फरक अभ्यासण्यासाठी व्यक्तिमत्व ही संकल्पना वापरली जाते. जसे वरील उदाहरणार्थ एक विद्यार्थी तयारी करतो, दुसरा खुश होतो तर तिसरा निराश. असे का? त्याचबरोबर प्रत्येकाच्या वर्तनातील वार्तनिक सुसंगती अभ्यासण्यासाठी ही या संकल्पनेचा उपयोग होतो. जसे तक्रार करणाऱ्या विद्यार्थी सातत्याने असमाधानी का दिसून येतो.

थोडक्यात व्यक्तिमत्त्व ही बहुआयामी संकल्पना समजून घेण्याकरिता मानसशास्त्रज्ञांना त्याचे मापन करावे लागते. अक्षरशः या हेतूसाठी शंभरच्या आसपास व्यक्तिमत्व चाचण्या उपलब्ध आहेत. पण त्यापैकी काही चाचण्यांची माहिती आपण येथे घेणार आहोत.

4.1 भावनिक बुद्धिमत्तेचे मापन (MEASURES OF EMOTIONAL INTELLIGENCE)

मानसशास्त्राच्या इतिहासात, भावना आणि बुद्धिमत्ता यांना, सामान्यतः व्यक्तीच्या भिन्न क्षमता म्हणून पहिले आहे, अशा क्षमता ज्या एकमेकांवर प्रभाव पाडतात, पण तरीही एकमेकांपसून भिन्न असतात. याचे समर्थन करणाऱ्यांमध्ये उदाहरणार्थ, थॉमस चाल्मर्स (1833) आणि अमेरिकन मानसशास्त्रज्ञ हेन्री एच. गोडार्ड (1919) यांचा समावेश होतो.

तथापि, भावनिक आणि बौद्धिक घटक यांच्या एकत्रीकरणावर भर देणारी पहिली व्यक्ती म्हणजे प्रख्यात अमेरिकन मानसशास्त्रज्ञ ई. एल. थॉर्नडाइक (1920). हार्पर नावच्या मासिकासाठी लिहलेल्या लेखामध्ये त्यांनी, अमूर्त बुद्धिमत्ता (abstract), यांत्रिक बुद्धिमत्ता (mechanical) आणि सामाजिक बुद्धिमत्ता (social) असे बुद्धिमत्तेच्या तीन प्रकारांचा उल्लेख केलेला आहे. पहिले दोन प्रकार मूल्यमापनात सुप्रसिद्ध आहेत आणि वारंवार प्रमाणित केले गेले आहेत. तर, "लोकांना समजून घेण्याची आणि त्यांना हाताळण्याची क्षमता" ("the ability to understand and manage people.") अशी सामाजिक बुद्धिमत्तेची व्यख्या थॉर्नडाइकने केली आहे. या क्षमतेचा एक आवश्यक भाग म्हणजे इतरांमधील भावना अचूक ओळखणे. तथपि, सामाजिक बुद्धिमत्ता मापन्याचे सुरवातीचे प्रयत्न निष्फळ ठरले (थॉर्नडाइक आणि स्टीन, 1937). पण, हळुवार ही संकल्पना अनुकूल होत गेली.

अलीकडे, मेयर, सालोवे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी भावनिक बुद्धिमत्तेच्या सिद्धांतात (सालोवे आणि मेयर, 1989-90; मेयर, सालोवे, आणि कारुसो, 2008) भावना आणि बुद्धिमत्ता एकमेकांशी जोडल्या असल्याची संकल्पना पुन्हा मांडल्याची दिसते. मेयर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी भावनिक बुद्धिमत्तेची व्याख्या करताना (2008) त्यामध्ये खालील घटकांची चर्चा केली आहे :

- **भावनांचे व्यवस्थापन (Managing emotions),** विशिष्ट उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी भावनांचे व्यवस्थापन करणे.
- **भावनांना समजून घेणे (Understanding emotions),** भावना, भावनिक भाषा आणि भावनांद्वारे व्यक्त केले जाणारे संकेत समजून घेणे.
- **विचार सुलभ करण्यासाठी भावनांचा उपयोग करणे (Using emotions to facilitate thinking)**
- **भावनांचे संवेदन (Perceiving emotions),** स्वतःमधील आणि इतरांमधील भावना अचूकपणे जाणणे.

या सैद्धांतिकांच्या मते भावनिक बुद्धिमत्ता पारंपारिक बुद्धिमत्तेपेक्षा वेगळी नसून पारंपरिक दृष्ट्या मांडण्यात आलेल्या बौद्धिक क्षमतांचाच एक महत्त्वाचा आणि दुर्लक्षित उपसंच आहे जो मानवी कार्यक्षमतेत आणि समायोजनात योगदान देतो. ज्याप्रकारे यापूर्वी शास्त्रज्ञांनी शाब्दिक बुद्धिमत्तेचा शाब्दिक आकलन आणि संवेदनिक बुद्धिमत्तेचा संवेदनिक तर्क असा प्रकार सांगितला आहे. याप्रमाणेच भावनिक बुद्धिमत्ता हा या दोन घटकांप्रमाणेच तिसरा पूरक घटक आहे.

पारंपारिक बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्ता कशी वेगळी आहे हे समजून घेण्यासाठी, तुम्ही हॉस्पिटलमध्ये तुमच्या जिवलग मित्राला भेटण्यास गेला आहात अशी कल्पना करा. अपघाताने डोक्याला इजा होऊन नुकताच आपत्कालीन शस्त्रक्रियेतून बाहेर आला आहे. आणि अजूनही डोळे मिटून अंथरुणावर पडून आहे. आशा परिस्थित आपल्याभोवती मित्राचा चिंताग्रस्त कुटुंब-परिवार आणि गंभीर चेहरा केलेला डॉक्टर उभा आहे. आशा परिस्थितीत तुम्ही काय कराल किंवा म्हणाल?

- त्या गंभीर, चिंताग्रस्त कुटुंबियांमध्ये जाऊन तुम्ही सामील व्हाल ?
- तुम्ही खोली सोडाल आणि पुन्हा परत याल?
- तुम्ही इतरांना मिठी माराल त्यांचे सांत्वन कराल?
- की तुम्ही डॉक्टरांकडून रुग्णाच्या प्रकृती विषयीच्या प्रगतीचा आढावा घ्याल?

काही सेकंदात तुम्हाला या किंवा इतर अनेक पर्यायांची निवडी करावी लागेल. आशा कठीण परिस्थितीत अनुरूप क्रिया करण्यासाठी तुम्हाला स्वताच्या **भावनांचे व्यवस्थापन** करावे लागेल (कदाचित तुम्हाला खूप आराम वाटत असेल की आत्ता आपण हॉस्पिटलच्या या बेडवर नाही), इतरांचे सूक्ष्म भावनिक संकेत **समजून घ्यावे** लागतील (कदाचित नर्सचे टक लावून पाहणे सूचित करते की यावेळी हॉस्पिटलच्या खुर्चीवर तुमचा नंबर नाही), **विचार सुलभ** करण्यासाठी स्वताच्या भावनांचा उपयोग करावा लागेल (कदाचित तुम्हाला झालेला मानसिक त्रास इतका तीव्र असेल की तुम्हाला तूर्तास शांत राहणे शहाणपणाचे वाटते), आणि इतरांच्या **भावनांचे अचूक संवेदन** झाले पाहिजे (जसे कदाचित प्रत्येकजण शांत आहे कारण मित्र नुकताच झोपू लागला आहे). या कठीण आणि वेदनादायक परिस्थितीत यशस्वी वर्तन करण्यासाठी उच्च पातळीच्या भावनिक बुद्धिमत्तेची आवश्यक्ता असते. तथापि, भावनिक बुद्धिमत्तेचे मापन करण्यासठी मेयर, सालोवे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी MSCEIT म्हणजेच Mayer-Salovey-Caruso Emotional Intelligence Test (Mayer, Salovey, & Caruso, 2002) बनवली आहे. ज्यामध्ये एकूण 141 कलमांचा समावेश आहे. 17 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रौढांसाठी ही चाचणी चालते. 5,000 पेक्षा जास्त प्रातिंनिधिक नमुन्यावर ही चाचणी प्रमाणित करण्यात आली आहे.

MSCEIT चे वर्णन करणारा तक्ता

EXPERIENTIAL AREA (अनुभवात्मक क्षेत्र)

Perceiving Branch (भावनांचे संवेदन)

- **चेहरे** (Faces): दाखविलेल्या चेहऱ्याच्या छायाचित्रामधील व्यक्तींच्या भावना 1 ते 5 बिंदु श्रेणीवर ओळखणे.
- **चित्रे** (Pictures): दाखविलेल्या प्रतिमा आणि छायाचित्रे किती प्रमाणात विविध भावना व्यक्त करतात हे 1 ते 5 बिंदु श्रेणीवर दर्शीविणे (उदा., 1 = अजिबात नाही, 5 = खूप प्रमाणात). उदाहरणार्थ. [1]

Example of MSCEIT Branch 1 – Identifying Emotions

Indicate the emotions expressed by this face. खालील चेहऱ्यातून व्यक्त होणाऱ्या भावना दर्शवा					
Happiness आनंदी	1	2	3	4	5
Fear दुखी	1	2	3	4	5
Sadness निराश	1	2	3	4	5

Facilitating Branch (भावना सुलभ करणे)

- **संवेदने** (Sensations): प्रकाश, रंग आणि तापमान यासारख्या भिन्न संवेदनांशी संबंधित भिन्न भावनांची 1 ते 5 बिंदु श्रेणीवर तुलना करणे (उदा. 1 = अजिबात नाही, 5 = खूप प्रमाणात).
- **सुलभता** (Facilitation): सामाजिक परिस्थितींना प्रतिसाद देण्यासाठी विशिष्ट प्रकारचे भाव कशी मदत करू शकतात हे निर्देशित करणे (उदा. 1 = उपयुक्त नाही, 5 = उपयुक्त). उदाहरणार्थ. [1]

Example of MSCEIT Branch 2 – Using Emotions

What mood(s) might be helpful to feel when meeting in-laws for the very first time?

	Not Useful ना उपयुक्त				*Useful* उपयुक्त
Tension तणाव	1	2	3	4	5
Surprise आश्चर्य	1	2	3	4	5
Joy आनंद	1	2	3	4	5

STRATEGIC AREA (युक्त्यात्मक क्षेत्र)

Understanding Branch (भावना समजून घेणे)

- **संमिश्रण** (Blends): वर्णन केलेल्या भावनिक परिस्थितीच्या उपस्थितीत, दिलेल्या 5 पर्यायी भावनांपैकी कोणती भावना उद्भवेल हे दर्शीविणे.
- **बदल** (Changes): वर्णन केलेल्या प्रारंभिक भावनिक स्थितीतून दिलेल्या 5 पर्यायी भावनांपैकी कोणती भावनिक प्रतिक्रिया उमटेल हे दर्शीविणे. उदाहरणार्थ. [1]

Example of MSCEIT Branch 3 – Understanding Emotions

1) आपल्याला करावयाच्या कामांचा विचार मनात येता, टॉम थोडा चिंतित आणि तणावग्रस्त झाला. अशा स्थितीत जेंव्हा त्याच्या पर्यवेक्षकाने त्याला जादाचे काम दिले तेंव्हा तो काय अनुभवतो ____. यासाठी खालीलपैकी उत्तम पर्याय निवडा.

अ) भारावून गेला ब) निराश झाला क) लाज वाटू लागली ड) स्व-जाणीव झाली इ) चिडचिड झाली

Managing Branch (भावनांचे व्यवस्थापन करणे)

- **भावना व्यवस्थापन** (Emotion Management): दिलेली भावनिक स्थिति साध्य करण्यासाठी दिलेल्या पर्यायी कृतीच्या प्रभाविपणाचे 1 ते 5 बिंदु श्रेणीवर मूल्यांकन करणे (1 = अतिशय अप्रभावी , 5 = अतिशय प्रभावी)
- **भावनिक संबंध** (Emotional Relations): इतरांचा समावेश असता इच्छित परिणाम साध्य करण्यासाठी दिलेल्या पर्यायी कृतीच्या प्रभाविपणाचे 1 ते 5 बिंदु श्रेणीवर मूल्यांकन करणे (1 = अतिशय अप्रभावी ते 5 = अतिशय प्रभावी). उदाहरणार्थ. [1]

डेबी नुकतीच सुट्टीवरून परतली आहे. आणि तिला शांत आणि समाधानी वाटत होते. तथापि, खालीलपैकी प्रत्येक कृती तिच्या या भावना कितपत टिकवून ठेवतील?

कृती 1: तिला आवश्यक असणाऱ्या घरातल्या गोष्टींची यादी बनवण्यास तिने सुरुवात केली.

अतिशय अप्रभावी..1.....2.....3.....4.....5.. अतिशय प्रभावी

क्रिया 2: पुढच्या सुट्टीवर कुठे आणि केव्हा जावे याचा ती विचार करू लागली.

अतिशय अप्रभावी..1.....2.....3.....4.....5.. अतिशय प्रभावी

1 https://mikegosling.com/pdf/MSCEITDescription.pdf

या चाचणीवर एकूण चार प्रकारची स्पष्टीकरणे मिळतात.

1. एकूण भावनिक बुद्धिमत्ता गुणांक (total emotional intelligence score).
2. दोन क्षेत्रावरील गुणांक (two area scores) (अनुभवात्मक क्षेत्र आणि युक्त्यात्मक क्षेत्र).
3. चार शाखांवरील गुणांक (four branch scores).
4. आठ कार्यांवरील गुणांक (eight task scores). खालील रखान्यात यांचे वर्णन केले आहे.

या चाचणीवर मिळालेल्या एकूण गुणांकाला भावनिक बुद्धिमत्ता (EI) असे म्हटले जाते. एकूण चाचणीची अंतर्गत चाचणी विश्वसनीयता घनिष्ठ असून .90 पेक्षा थोडी कमी असून एकूण चाचणीची चाचणी-पुनर्चाचणी विश्वसनीयता .86 वर समाधानकारक आहे (ब्रॅकेट आणि मेयर, 2003). तर दोन्ही क्षेत्रांची विश्वसनियत .80 वर आहे.

या सारख्या चाचण्यांची एक समस्या म्हणजे प्रश्नास अनुसरून अचूक उत्तराचे निर्धारण कसे करायचे. कारण मार्मिक भावनिक संकल्पना दडलेल्या प्रश्नांना स्वाभाविकपणे अचूक प्रतिक्रिया येणे शक्य नसते. उदाहरण म्हणून पुढील उदाहरण घ्या.

दुचाकी चालवताना वेगमर्यादा ओलांडल्याने नुकतेच एका पोलिस अधिकाऱ्याने तुम्हाला थांबविल्याने त्याच्याशी बोलताना कोणत्या भावना उपयुक्त ठरतील/ठरेल?

आदर	उपयुक्त नाही ..1.....2.....3.....4.....5.. अतिशय उपयुक्त
सौम्य चिंता	उपयुक्त नाही ..1.....2.....3.....4.....5.. अतिशय उपयुक्त
आश्चर्य	उपयुक्त नाही ..1.....2.....3.....4.....5.. अतिशय उपयुक्त
चिडचिड	उपयुक्त नाही ..1.....2.....3.....4.....5.. अतिशय उपयुक्त

याचे उत्तर चाचणीच्या गुणांकनात मिळते.

- **चाचणीचे गुणांकन**:

चाचणीचे गुणांकन दोन पद्धतीने करता येते. सर्वानुमत गुणांकन (consensus scoring,) आणि तज्ञ गुणांकन (expert scoring). **1) सर्वानुमत गुणांकनामध्ये (**consensus scoring**)**, अचूक पर्यायाचे निर्धारण करण्यासाठी प्रातिनिधिक नमुन्यातील बहुतांश व्यक्तींनी निवडलेल्या पर्यायाचा उपयोग केला जातो. उदाहरणार्थ, वरील उदाहरणाबाबत जर 67% सामान्य लोकसंख्येने “चिडचिड” या भावनेसाठी “1” या पर्यायची निवड केली असेल (म्हणजे चिडचिड ही भावना उपयुक्त नाही) तर, हे उत्तर योग्य पर्याय म्हणून निवडले जाईल. ज्या सहभाग्यांचा वरील प्रमाणित पर्यायावर कमी गुणांक येईल ते या पर्यायापासून दूर जातील. अचूक पर्यायाचे निर्धारण करण्यासाठी प्रातिनिधिक नमुन्याचे मत केंद्रबिंदू असल्याने या पद्धतीला सामान्य गुणांकन असेही म्हणतात. पण या गुणांकन पद्धती बाबत, भावना या उत्क्रांतिवादी आणि सामाजिक आधार धारण करून असतात का? हा प्रश्न उपस्थित होतो. तर, भावना एक "संकेत यंत्रणा" बनवतात जी भावनेतील महत्वाची माहिती आपल्या सभोवतालच्या लोकांपर्यंत पोहोचवते. उदाहरणार्थ, दुःखाच्या भावनेतून व्यक्तीची हानी झाली आहे आणि तिला सांत्वनाची गरज असल्याचे सूचित होते; क्रोध भावना इतरांना धोका असल्याचे सूचित करते; तर आनंदाची भावना इतरांना सामील होण्याचे सकारात्मक संकेत देते. त्यामुळे भावना या सार्वजनिक आणि उत्क्रांतिवादी गुण धारण करून असतात हे स्पष्ट होते. ज्या व्यक्तींना या सार्वजनिक भावना "वाचता" येत नाहीत त्यांना सामाजिक परिस्थितींमध्ये आंतरक्रिया करताना मोठ्या प्रमाणात अडचण येऊ शकतात.

2) दुसरी पद्धती, **तज्ञ गुणांकन पद्धती (**expert scoring**)**, अचूक पर्यायाचे निर्धारण करण्यासाठी भावानांचा अभ्यास करणाऱ्या क्षेत्रातील तज्ञांच्या मतावर अवलंबून असते. विशेषतः, International Society for Research on Emotion च्या परिषदेस उपस्थित राहिलेल्या 21 तज्ञांचा वापर लेखकांनी याठिकाणी केला आहे. या तज्ञांच्या सर्वानुमतावर ही गुणांकन पद्धती अवलंबून आहे.

MSCEIT ची **यथार्थता** अनेक दृष्टीकोनातून तपासली आहे, ज्यामध्ये घटकिया, भेदनिक आणि पूर्वकथनीय यथार्थतेचा समावेश होतो. या चाचणीद्वारे भावनिक बुद्धिमत्तेचे मापन केले असता, शाब्दिक बुद्धिमत्ता, सामान्य बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्त्वाच्या मुख्य घटकांशी या चाचणीचा निम्न सहसंबंध दिसून आला. त्यामुळे प्रस्थापित मापन साधनांपेक्षा ही चाचणी एक वेगळे मापन पुरवत असल्याचे यातून स्पष्ट होते (मेयर, सालोवे, आणि कारुसो, 2004). तसेच, गुंडगिरी, मादक द्रव्यांचा उपयोग आणि हिंसक्ता इत्यादि विचलित वर्तनाच्या मापनासाठी सुद्धा संभाव्यता ही चाचणी अधिक उपयुक्त ठरते.

- **टीका/मर्यादा.**

इतके चांगले आधार असून ही काही समीक्षक, ही आणि यासारख्या इतर तत्सम चाचण्या वापरताना दक्षता घेण्यास सूचित करतात. जसे, झेडनर, रॉबर्ट्स आणि मॅथ्यूज (2008) म्हणतात की "भावनिक बुद्धिमत्तेच्या व्यावहारिक उपयोगिते बाबत अतार्किक उत्साह दिसतो." ते असेही म्हणतात, व्यावसायिक यशस्वीतेतील भावनिक बुद्धिमत्तेची भूमिका खूप कमकुवत असून अपूर्ण माहिती आणि डॅनियल गोलमन (1995) सारख्या अभ्यासकांनी लिहलेल्या Emotional Intelligence: Why It Can Matter More than IQ सारख्या भावनिक बुद्धिमत्तेच्या प्रेरणादायी स्रोतांवर आधारित आहे.

इतपत, मेयर, सालोवे, कारुसो आणि सितारेनिओस (2003) स्पष्टपणे सांगतात की, "EI चाचणी चा उपयोग करताना अधिक सावधगिरी घेणे आवश्यक आहे." कर्मचाऱ्यांच्या निवडीसाठी या चाचणीच्या वापरात वाढ होत आहे जे अस्वस्थ करणारे आहे. तसेच, "जोपर्यंत या चाचणीबाबत अधिक भेदनिक, पूर्वकथनीय आणि वृद्धीगत यथार्थता पुरावे उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत व्यवस्थापक आणि संघटना प्रमुखांनी या चाचणीच्या वापराबाबत दक्षता घ्यावी असे कॉन्टे (2005) म्हणतात.

MSCEIT व्यतिरिक्त, भावनिक बुद्धिमत्तेच्या मापन करणाऱ्या इतर काही पसंती मिळालेल्या चाचण्या आहेत. यातील एक म्हणजे **भावनिक सक्षमता शोधिका** (Emotional Competence Inventory – ECI) (सला, 2002), गोलेमन (1995) यांनी सांगितलेल्या भावनिक बुद्धिमत्तेच्या संकल्पनेवर ही शोधिका आधारित आहे. या शोधिकेमध्ये एकूण 110 कलमे असून ती पुढील चार भागांमध्ये विभागली आहेत: (1) स्व-जाणीव, (2) सामाजिक जाणीव, (3) स्व-व्यवस्थापन आणि (4) सामाजिक कौशल्ये. तुलना करण्याच्या अनुषंगाने यामध्ये, स्व-श्रेणी, समवयस्क श्रेणी आणि पर्यवेक्षक श्रेणी देण्यात आली आहे. व्यावसायिक संकुलात कर्मचाऱ्यांच्या मापनासाठी ही चाचणी मोठ्या प्रमाणात वापरली जाते.

भावनिक बुद्धिमत्तेच्या मापनासाठी मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी दुसरी चाचणी म्हणजे **Bar-On Emotional Quotient Inventory** (बार-ऑन, 2000). पारंपरिक दृष्ट्या ही शोधिका EQ-i या संक्षिप्त नावाने ओळखली जाते. या 133 कलमी स्व-निवेदित साधनाद्वारे एकूण भावनिक बुद्धिगुणांक आणि पुढील पाच घटकांवर संमिश्र गुणांक मिळतात (Bar – On, R., 2006). त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे.

	EQ-i शोधीकेतील उपघटक	प्रत्येक उपचाचणीद्वारे मापल्या जाणाऱ्या क्षमता
(1)	**व्यक्तिअंतर्गत (intrapersonal)**	**हा घटक स्व-जाणीव आणि स्व-अभिव्यक्तीवर भर देतो.**
	स्व- अस्मिता (Self-Regard)	स्वतःला अचूकपणे ओळखणे, समजून घेणे आणि स्वीकारणे.
	भावनिक स्व-जाणीव (Emotional Self-Awareness)	स्वताच्या भावनांची जाणीव असणे आणि भावना समजून घेणे.
	ठामपणा (Assertiveness)	स्वतःच्या भावना आणि स्वताला प्रभावीपणे आणि रचनात्मकपणे व्यक्त करणे .
	स्वअवलंबित्व/आत्मनिर्भर (Independence)	आत्मनिर्भर आणि इतरांवर भावनिक दृष्ट्या अवलंबी नसणे.
	आत्मवास्तविकरण (Self-Actualization)	व्यक्तिगत उद्दिष्टे साध्य करण्यासाठी झगडणे आणि स्वताच्या क्षमता ओळखणे
(2)	**आंतरवैयक्तिक (interpersonal)**	**हा घटक सामाजिक जाणीव आणि आंतरवैयक्तिक नातेसंबंधावर भर देतो.**
	समानुभूती (Empathy)	इतर काय अनुभवतात याची जाणीव असणे आणि ते समजून घेणे.
	सामाजिक जबाबदारी (Social Responsibility)	स्वतःचा सामजिक समूह ओळखणे आणि इतरांशी सहकार वृत्तीने वागणे.
	आंतरवैयक्तिक नातेसंबंध (Interpersonal Relationship)	इतरांशी परस्पर सलोख्याचे समाधानकारक आणि चांगले संबंध प्रस्थापित करणे
(3)	**समायोजितता (adaptability),**	**हा घटक समायोजित बदलांवर भर देतो.**
	वास्तविक तपासणी (Reality-Testing)	स्वताच्या भावनांचा वस्तुनिष्ठपणे अर्थ लावणे आणि बाह्य जगातील वास्तविकतेस अनुसरून विचार करणे.
	लवचिकता (Flexibility)	नवीन परिस्थिति नुसार स्वतःच्या भावना आणि विचार स्वीकारणे आणि जुळवून घेणे.
	समस्या – समाधान (Problem-Solving)	वैयक्तिक आणि आंतरवैयक्तिक समस्या प्रभावीपणे सोडविणे.
(4)	**सामान्य भाव (general mood)**	**हा घटक स्व-प्रेरणेवर/स्वयंप्रेरणेवर भर देतो.**
	आशावाद (Optimism)	सकारात्मक राहणे आणि जीवनाच्या सकारात्मक बाजूकडे पाहणे.
	आनंद (Happiness)	स्वतःशी, इतरांशी आणि सामन्यात जीवनात समाधानी राहणे.
(5)	ताण व्यवस्थापन (stress management).	भावनांचे व्यवस्थापन आणि नियमनावर हा घटक भर देतो.
	ताण संहिष्णुता (Stress Tolerance)	प्रभावीपणे आणि रचनात्मक रित्या स्वताच्या भावना हाताळणे.
	आवेगांवरील नियंत्रण (Impulse Control)	प्रभावीपणे आणि रचनात्मकरित्या स्वताच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे.

Bar – On, R (2006).

एक महिन्याच्या अंतराने या शोधीकेची चाचणी-पुनर्चाचणी विश्वसनीयता .85 इतकी दिसून आली आहे (Bar On, 1997).

4.2 व्यक्तिमत्व चाचण्या : अभिव्यक्ती तंत्रे आणि प्रक्षेपण तंत्रे

(PERSONALITY TESTS : EXPRESSION TECHNIQUES AND PROJECTIVE TECHNIQUES)

अ) अभिव्यक्ती तंत्रे (Expression Techniques)

1) व्यक्ति - रेखाटन चाचणी (The Draw-A-Person Test) : सोफी कॅरेन आल्पर म्हणजेच कॅरेन मॅकोवर (1949, 1951) या रशिया मध्ये जन्मलेल्या पण अमेरिकन महिला मानसशास्त्रज्ञाने ही चाचणी विकसित केली. यापूर्वी गुडनफ (1926) ने बुद्धिमत्तेच्या मापणासाठी व्यक्ति-रेखाटन पद्धतीचा उपयोग केल्याचे दिसते. त्यानंतर, मनोगतिकी मानसशास्त्रज्ञानी प्रक्षेपणात्मक दृष्टिकोनातून व्यक्तिमत्वाचे मापन करण्यासाठी ही पद्धती स्वीकारल्याचेही दिसते. पुढे जाऊन मॅकोवर यांच्या पद्धतीस व्यक्ति - रेखाटन चाचणी (Draw-A-Person Test - DAP) म्हणून ओळखले जाऊ लागले. यांना या आधुनिक पद्धतीचे आद्य संशोधक म्हणून ओळखले जाते.

या चाचणीस खूप लवकर प्रसिद्धी मिळाली आणि आज ही एक चिकित्सालयीन प्रक्षेपणात्मक मापन साधन म्हणून ही चाचणी मोठ्या प्रमाणात वापरली जाते. वॅटकिन्स, कॅम्पबेल, निबर्डिंग, आणि हॉलमार्क (1995) यांच्यामते युनायटेड स्टेट्स मध्ये चिकत्सकांमध्ये लोकप्रियते बाबत DAP ही चाचणी आठव्या क्रमांकावर आहे.

- **चाचणी प्रशासन** (test administration)

DAP च्या चाचणी प्रशासनामध्ये परीक्षणार्थिस एक कोरा कागद, पेन्सिल (खोडरबर सहित) दिली जाते. आणि परीक्षणार्थिस "व्यक्तीचे चित्र रेखाटण्यास " संगितले जाते. जेव्हा व्यक्तिचित्र पूर्ण होते तेव्हा परीक्षणार्थीस पहिल्या व्यक्तिचित्राच्या विरुद्धलिंगी व्यक्तीचे व्यक्तिचित्र काढण्यासाठी संगितले जाते. शेवटी, परीक्षणार्थीस "या व्यक्तींबद्दल अशी कथा तयार करण्यास सांगितले जाते जसे की तो [किंवा ती] व्यक्ति एखाद्या कादंबरी किंवा नाटकातील एखादे पात्रच आहे" (मॅकोवर, 1949).

- **DAP चे स्पष्टीकरण** (Interpretation of the DAP)

DAP चे स्पष्टीकरण संभाव्य मनोगतिकी गृहीतकांवर आधारित चिकित्सालयीन - अंतरमर्म पद्धती द्वारे होते (मॅकोवर, 1949, 1951). उदाहरणार्थ, मॅकोवर यांच्यामते समलिंगी आकृतीवर परीक्षणार्थी स्वीकार्य आवेग आणि विरुद्ध-लिंग आकृतीवर अस्वीकार्य आवेग प्रक्षेपित करतात. तसेच चित्रातील पुरुष आणि स्त्रीच्या अवयवांच्या आकारावरून परीक्षणार्थी मधील लैंगिक ओळखी विषयक सुचके मिळतात. उदाहरणार्थ, चित्रातील पुरुषाचे डोळे मोठे आणि आणि पापण्या रेखाटणे पुरुष परीक्षणार्थी मधील समलैंगिक प्रवृत्ती सूचित करतात. मिळालेले संकेत व त्यांच्या स्पष्टीकरणाची यादी पुढील प्रमाणे.

मॅकोवर ने DAP वरील चित्रांच्या संभाव्य स्पष्टीकरणाची संगीतलेली यादी

संकेत	स्पष्टीकरण
प्रमाणापेक्षा **डोके** अधिक मोठे असणे…	मस्तिष्कजन्य मेंदू विकृतीने ग्रस्त असलेल्या व्यक्ती, ज्यांच्या मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे आणि ज्यांना डोकेदुखी किंवा डोक्याशी संबंधित विशेष संवेदनशीलतेचा त्रास आहे.
चेहऱ्याची वैशिष्ट्ये जाणीवपूर्वक वगळणे…	त्याच्या परस्पर विरोधी आंतर वैयक्तिक नाते संबंधाबाबत टाळाटाळ करणारा
जाड जुड रेषांनी **तोंड** रेखाटले असेल तर …	शाब्दिक दृष्ट्या आक्रमक, अति टिकात्मक, आणि कधीकधी दुखी व्यक्तिमत्व
हनुवटी बदलली असेल मिटवली किंवा मजबूत केली असेल तर ...	स्वतःमधील दुर्बलस्थाने, निर्णय क्षमतेचा अभाव आणि जाबाबदारीच्या भितीवर व्यक्ति मात करून सामाजिक दृष्ट्या ताकदवान आणि प्रभावी होण्याची प्रचोदना व्यक्तिमध्ये दिसते.
पुरुषाचे मोठे **डोळे** आणि आणि पापण्या…	समलिंगी प्रवृती असलेला पुरुष, बरेचदा सामाजिक दृष्ट्या बहिर्मुखी
केसांचा भर, उदाहरणार्थ दाढीवर असेल...	पुरुषत्व सिद्ध करण्यासाठीचा संघर्ष दिसतो
मान रेखाटण्यावर दिलेलेला भर…	आवेगांवरील नियंत्रणा अभावी अस्वस्थता असणे
तर्जनी, अंगठ्याचे सुस्पष्ट रेखाटन असणे…	हस्तमैथुन करण्यात पूर्ववतता
अंतर्गत अवयवांचे शारीरिक संकेत असणे…	हे संकेत खिन्नमनस्कता आणि उन्माद विकृतीच्या रुग्णांमध्ये दिसतात

DAP मधून मिळणारी स्पष्टीकरणे अधिक मनोरंजक आणि प्रशंसनीय आहेत. तथापि, ही स्पष्टीकरणे पूर्णपणे मनोगतिकी सिद्धांत आणि तथ्यात्मक निरीक्षणांवर आधारित असली तरी मॅकोवरने यांचे यथार्थिकरण करण्यासाठी अल्प प्रयत्न घेतले आहेत. यासाठीचे अनुभवजन्य आधार कुठेतरी अल्प प्रमाणात आहेत किंवा अस्तित्वातच नाहीत (स्वेनसेन, 1968). रेखाचित्रांची एकूण गुणवत्ता मानसशास्त्रीय समायोजनाचे अगदी कमकुवत पूर्वकथन करतात (लेविनसोहन, 1965; यमा, 1990). तसेच, समकालीन मानदंडावर आधारित पुरव्यांच्या आधारे व्यक्तिमत्वा विषयी निष्कर्ष काढणे इतके खात्रीलायक वाटत नाही. काही समीक्षकांच्या मते, DAP ही व्यक्तिमत्वाच्या मापनासाठी योग्य चाचणी नसून तिचा अधिक काळ वापर केला जाऊ शकत नाही (ग्रेशम, 1993; मोटा, लिटल, आणि टोबिन, 1993). त्यामुळे या चाचणीचा अधिक योग्य उपयोग वार्तनिक विकृती आणि भावनिक व्यत्यय याबाबत साशंकता असणाऱ्या मुलांच्या मापनासाठी अधिक योग्य आहे. या उद्देशासाठी, नगलिएरी, मॅकनीश आणि बार्डोस (1991) यांनी Draw A Person: Screening Procedure for Emotional Disturbance (DAP:SPED) विकसित केली आहे.

2) घर- वृक्ष - व्यक्ति चाचणी (The House-Tree-Person Test - H-T-P) : H-T-P ही एक प्रक्षेपण चाचणी आहे ज्यामध्ये परीक्षणार्थीने खुल्या हाताने घर, झाड आणि व्यक्तीचे रेखाचित्र रेखाटायचे असते (बक, 1948, 1981). ज्यामध्ये पेन्सिल आणि रंगीत खडूच्या आधारे स्वतंत्र रेखाचित्रे बनविण्याची विनंती केली जाते. चित्रे रेखाटण्यासाठी एकूण चार कोरे कागद दिले जातात. ज्यापैकी पहिल्या कोऱ्या कागदावर परीक्षणार्थींचा ओळखीचा तपशील आणि उर्वरित तीन कागदांवर अनुक्रमे घर, झाड आणि व्यक्तीचे चित्र रेखाटण्यास संगितले जाते. वरती उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक परीक्षणार्थीने पेन्सिल आणि रंगीत खडूच्या आधारे दोन प्रकारची चित्रे काढायची आहेत. चित्र रेखाटन पश्चात चौकशी साठी बक (1981) यांनी स्वतंत्र चार पानी फॉर्म देखील दिला आहे, ज्यामध्ये रेखाचित्रांतिल घटकांबद्दल परीक्षणार्थींचे मत जाणून घेण्यासाठी चौकशी करणाऱ्या 60 प्रश्नांचा समावेश आहे. मात्र अनेक सरावकर्त्यांना ही रेखाचित्र रेखाटन पश्चात चौकशी अनावश्यक वाटते. तसेच, रंगीत खडुंच्या आधारे बनवल्या जाणाऱ्या स्वतंत्र रेखाचित्राबाबातही काहींनी प्रश्न उपस्थित केल्याचे दिसतात (किलियन, 1987). HTP ही चाचणी DAP च्या परिवारचाच एक घटक आहे असे म्हणायला हरकत नाही. कारण ही चाचणी सुद्धा बुद्धिमत्तेच्या मापनाच्या हेतूनेच सर्वप्रथम बनविण्यात आली होती (बक, 1948). तथापि, चिकित्सकांनी लवकरच H-T-P बुद्धिमत्तेच्या मापना ऐवजी व्यक्तिमत्वाच्या मापणासाठी वापरण्यास सुरवात केली. H-T-P चे **स्पष्टीकरण** तीन सामान्य गृहीतकांवर आधारित आहे: **घराच्या** चित्रातून परीक्षणार्थींचे कौटुंबिक जीवन आणि कुटुंबा बाहेरील नातेसंबंधाचे सापष्टीकरण होते. **वृक्षाच्या** चित्रातून परीक्षणार्थी अनुभवत असलेले वातावरण प्रतिबिंबीत होते. तर, **व्यक्तीच्या** चित्रातून परीक्षणार्थींच्या आंतरवैयक्तिक नातेसंबंधाचे स्पष्टीकरण होते. H-T-P ही चाचणी 40 वर्षांहून अधिक काळ चिकित्सकांसाठी एक मोहक चाचणी राहिली आहे. पण, बकने (1948, 1981) या चाचणीची विश्वसनीयता आणि यथार्थता सिद्ध करणारे कोणतेही पुरावे कधीच दिले नाहीत. इतपत, स्वतःच्या चाचणीचा एक टीकाकारच त्याला म्हणता येईल. कारण, या चाचणीच्या मार्गदर्शक पुस्तिकेतच तो म्हणतो की, या चाचणीची यथार्थता सिद्ध करणारी संशोधने करणे अशक्य आहे (बक, 1981). थोडक्यात व्यक्तिमत्व मापन साधन म्हणून H-T-P चे यथार्थिकरण करण्याचे प्रयत्न सपशेल अपयशी झाले आहेत. त्यामुळे अलीकडील काही वर्षात H-T-P च्या लोकप्रियतेत घट झाल्याची दिसते. APA च्या PsychINFO च्या तपासामध्ये सन 2000 पासून या चाचणीवर केवळ नऊ लेख लिहल्याचे उघड झाले आहे, ज्यामध्ये चार प्रबंधांचा समावेश आहे. बरेचसे चिकित्सक एक प्रक्षेपण चाचणी म्हणून न वापरता, चिकित्सालयीन मुलाखतीसाठी एक सहाय्यक साधन म्हणून ही चाचणी वापरतात. परीक्षणार्थी विषयी अंदाज बांधण्यासाठी या चाचण्यांचा उपयोग केली जातो. ज्यातील बरीच गृहीतके परीक्षणार्थींचे जवळून परीक्षण केले असता पुढे जाऊन चुकीची ठरतात.

ब) साहचर्य तंत्रे (Association Techniques)

1) रोर्शा यांची शाई – डाग चाचणी (Rorchach Ink Blot Test) : ही चाचणी स्वीस मनोचिकीत्सक हर्मन रोर्शा (Herman Rorschach) यांनी बनवली म्हणून या चाचणीस रोर्शा शाई डाग चाचणी तंत्र म्हणून ओळखले जाते.

सन 1921 मध्ये रोर्शा यांनी ही चाचणी बनविली. यामध्ये एकूण दहा कार्डांचा समावेश असून प्रत्येक कार्डावर शाईचे डाग (ठिपके) आहेत. रोर्शाने कागदावर शाईचे ठिपके पाडून ते मधून फोल्ड केले व बरोबर मधून ते कार्ड फोल्ड करून दोन्ही बाजू समान शाईचे डाग उमटतील असे द्विपार्श्वी शाईचे डाग असणारे एकूण दहा कार्ड बनविले. यामधील पाच कार्ड हे काळ्या व करड्या रंगाचे आहेत. तर उर्वरित पाच कार्ड रंगीत आहे. त्यातील प्रत्येक कार्ड काळ्या व पांढऱ्या पार्श्वभूमीवर आहे. ही चाचणी पाच वर्षाच्या मुलापासून ते त्यापुढील वयाच्या प्रौढांसाठी चालते. पण विशेष करून प्रौढांच्या मापनासाठी ही चाचणी जास्त वापरली जाते.

- **चाचणी प्रशासन (Administration)**

रोर्शा चाचणीच्या प्रशासनामध्ये परिक्षक कोणत्याही स्वरूपाची शारीरिक प्रतिक्रिया (संप्रेषण) न देता तटस्थपणे परिक्षणार्थी समोर बसतो. या चाचणीच्या प्रशासनामध्ये दोन अवस्था दिसून येतात. पहिली म्हणजे **मुक्त साहचर्य अवस्था** (free Association phase). या अवस्थेत सर्वप्रथम परीक्षक परिक्षणार्थी समोर पहिले कार्ड सादर करतो आणि विचारतो "हे काय असू शकते" याठिकाणी परिक्षणार्थी परीक्षकास असे विचारत असेल "की या संपूर्ण शाई डागाचा मी वापर करू का?" तर "हे तुम्ही ठरवायचे आहे" असे अदिशादर्शकपणे परीक्षकाने उत्तर देणे अपेक्षित आहे. संपूर्ण चाचणी हसऱ्या खेळत्या वातावरणात प्रशासीत केली जाते. या ठिकाणी जर परीक्षणार्थीची इच्छा असेल तर एकाच कार्डास तो अनेक प्रतिक्रिया देऊ शकतो. विरुद्धार्थी संपूर्ण कार्ड नाकारूही शकतो. मात्र असे क्वचितच घडते. संपूर्ण दहा कार्ड हे एकाच पद्धतीने सादर केले जातात.

दुसरी अवस्था म्हणजे **चौकशीची अवस्था** (Inquiry phase). या अवस्थेत परिक्षक चौकशीस सुरुवात करतो. ज्यामध्ये शाईच्या कोणत्या डागावरुन (स्थान) परिक्षणार्थीने प्रतिक्रिया दिली हे ठरविण्यासाठी आकार, रंग, किंवा एखादी निर्मिती यावर आधारित प्रश्न परीक्षक विचारतो. या अवस्थेमध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारावर परीक्षक प्रत्येक प्रतिक्रियेचे विश्लेषण करून त्यांचे गुणांकन करतो व स्थान (location), निर्धारके (Determinants), आकार गुणवत्ता (form quantity) आणि घटक/आशय (content) अशा चार भागांमध्ये त्याचे संकेतन करतो. उदाहरणार्थ जर परिक्षणार्थीने संपूर्ण शाही डागावर आधारित प्रतिक्रिया दिली असेल तर त्याचे संकेतन W (whole) असे केले जाते. जर प्रतिक्रिया आकाराच्या दृष्टीने दिली असेल तर F (form) असे संकेतन केले जाते. याचबरोबर मानवी हालचालींचे M (Movement), रंगासाठी C (colour), आकार व रंगासाठी FC (form /colour), या संकेताचा वापर केला जातो. याचबरोबर घटक वर्गीकरणांमध्ये मानवासाठी H (Human), मानवी शरीराच्या वर्णनासाठी Hd (Human details), मानवी शरीरासाठी An (Anatomy), कपड्यांसाठी cg (clothing) अशा व इतर काही संकेताचा वापर गुणांकनासाठी केला जातो. रोर्शा चाचणीचे अचूक गुणांकन करण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

- **चाचणीचे गुणांकन (Scoring)**

दुर्भाग्यवश गुणांकन प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वी रोर्शा यांचा मृत्यू झाला. त्यामुळे रोर्शा पश्चात त्याचे सहकारी, पाच अमेरिकन मानसशास्त्रज्ञ सॅम्युअल बेक, मार्गुराइट हर्ट्झ, ब्रुनो क्लॉफर, झिग्मंट पिओट्रोव्स्की आणि डेव्हिड रॅपपोर्ट (Samuel Beck, Marguerite Hertz, Bruno Klopfer, Zygmunt Piotrowski, and David Rapaport) यांनी एकमेकांना व्यापणारी पण स्वतंत्र अशी गुणांकन पद्धती रोर्शा चाचणी साठी विकसित केली (एर्डबर्ग, 1985). मात्र यातील प्रत्येक गुणांकन पद्धतीमध्ये पूर्वकथनात्मकदृष्ट्या सूक्ष्म भेद दिसून येतो. पण सुदैवाने जॉन एक्सनर आणि त्यांचे सहकारी यांनी अतिशय पद्धतशीरपणे ही गुणांक पद्धती बहुविध गुणांकन पद्धतीमध्ये बसविली (एक्सनर, 1991, 1993; एक्सनर आणि वेनर, 1994). प्रायोगिक स्वरूपात व रोर्शाच्या इतर गुणांक पद्धतीबाबत बहुविध गुणांकन पद्धती अतिशय उपयुक्त ठरते.

शेवटी सर्व प्रतिक्रियांचे संकेतन करून झाल्यानंतर परीक्षक सर्व प्रतिक्रियांची सारांश रुपात एकत्रित बेरीज करतो. ज्यामुळे याआधारे प्रयुक्ताच्या व्यक्तिमत्त्वाविषयी भाकित करणे शक्य होते. जसे निर्धारकांमध्ये, F+ च्या एकूण सरासरी वरुन परिक्षणार्थीच्या पूर्ण आकाराच्या वापराचे प्रमाण दिसून येते. उदाहरणार्थ, जर परिक्षणार्थीच्या F+ प्रतिक्रियांची सरासरी 70% पेक्षा कमी दिसून येत असेल तर

याचा अर्थ परिक्षणार्थीमध्ये गंभीर मानसिक अपसामान्यत्व, मेंदू दोष किंवा बौद्धिक दोष आहे (एक्सनर, 1993). F+ प्रतिक्रियांची सरासरी अहम सामर्थ्य (Ego Strength) या अर्थानेही घेतली जाते. ज्यामध्ये उच्च गुणांक ताणाशी लढण्याचे सामर्थ्य दर्शवितो.

पण फ्रँक (1990) यांच्यामते, रोर्शा चाचणीची औपचारिक गुणांकन पद्धती खिन्नमनस्कतेसारख्या व विकृतींचे निदान करण्यासाठी उपयुक्त ठरत नाही. फ्रँक च्यामते, रुग्णांमधील अति व्यक्तीगतपणा, अतार्किकता, आणि शाई डागाशी असलेले विचित्र साहचर्य याचा उपयोग म्हणून मनोनिदानासाठी होतो. त्यामुळे रोर्शा चाचणी ही मुलाखतीच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

मात्र ब्रोनस्टीन व मासलिंग (2005) च्यामते रोर्शा चाचणीची बहुविध गुणांकन पद्धती संभ्रमित करणारी नसून अतिशय उपयुक्त आहे. यांनी लिहिलेले, "Scoring the Rorschach: seven validated system'' हे पुस्तक याचे उत्तम उदाहरण आहे. हॅन्डलर व क्लिमेन्स (2005) यांची "रोर्शा प्रोग्नोस्टिक रेटिंग स्केल" याच्या द्वारे मानसोपचारामध्ये कोण यशस्वी होईल हे सांगता येते. यावरून मनोरुग्णांसाठी रोर्शा चाचणी अतिशय उपयुक्त असल्याचे दिसून येते.

रोर्शा चाचणीसाठीची आणखीन एक उपयुक्त गुणांकन पद्धती म्हणजे **विचार विकृती अनुक्रमणिका** (Thought Disorder Index- TDI) होय. या आधारे विचार विकृतींचे मापन होते (होल्टझमन व इतर, 2005). विचार विकृतींमध्ये सौम्य स्वरूपाच्या झोपेच्या समस्या ते विचित्र असंघटनाचा विशेष करून खिन्नमनस्कतेची लक्षणे असणाऱ्या रुग्णांचा समावेश होतो. विशेषकरून खिन्नमनस्कता आणि गंभीर मानसिक आजार असणाऱ्या मनोरुग्णांचे निदान व त्यावर उपचार करण्यासाठी विचार विकृतीचे मापन केले जाते. अशा विकृतीचे रुग्ण रोर्शा चाचणीवर पुढील प्रकारच्या प्रतिक्रिया देतात. उदाहरणार्थ तोंड व नाक यामध्ये अंतर आहे, लाल रंग अडथळा असून तो आफ्रिकेचा प्रतीक आहे. त्यामुळेच आफ्रिकेतील लोक लाल असतात. रुग्णामध्ये विचार विकृती जितकी जास्त असेल तितकीच रोर्शा चाचणीवर या रुग्णांच्या प्रतिक्रियांची गुणवत्ता विचित्र व खालवलेली आणि गुंतागुंतीची असते. म्हणजेच TDI आणि रोर्शा चाचणीवर परीक्षणार्थींच्या प्रतिक्रिया जुळतात.

- **रोर्शा वरील टीका (comment on Rorschach)**

व्यक्तिमत्व मूल्यमापनाच्या क्षेत्रामध्ये इतर व्यक्तिमत्व मापन चाचण्यांपेक्षा रोर्शा चाचणी ही अतिशय वादग्रस्त चाचणी ठरली आहे. याबाबतचे काही अभ्यास रोर्शा चाचणीस आधार देणारे तर काही टिकात्मक ठरलेले आहे.

या संदर्भात महत्त्वाची गोष्ट म्हणजे रोर्शा चाचणीवर हजारोंच्या वर अभ्यास झालेले आहेत. इंटरनेटवर रोर्शा चाचणीवर अनेक आर्टिकल्स उपलब्ध होतात पण तरीही यासंदर्भात अल्बर्ट, फॉक्स आणि कान (1980) यांनी केलेल्या टिकात्मक अभ्यासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या अभ्यासामध्ये एकूण 24 प्रयुक्तांचा समावेश होतो. ज्यांच्याकडून रोर्शा चाचणी सोडवून घेऊन प्रत्येकी सहा या प्रमाणे चार गटांमध्ये विभागणी केली होती.

वरील अभ्यास या चार गटांचा समावेश होतो. यापैकी चौथ्या गटातील मुलांचे तर मुलाखतीदरम्यान सामान्य मुले म्हणून निदान केले होते. ज्यांनी MMPI ही चाचणी सोडविली होती.

या अभ्यासातील प्रत्येक प्रयुक्तांचे रोर्शा चाचणीवरील प्रतिक्रिया स्वतंत्रपणे नऊ ते सहा तज्ञ व यांच्या सहकार्याद्वारे तपासण्यात आल्या. या ठिकाणी अभ्यासाचा हेतू या तज्ञ व्यक्तींना सांगण्यात आला नाही. व असे सांगण्यात आले की यातील प्रत्येक प्रयुक्ताचे मनोनिदान करून त्यांच्याविषयी येथे पुरविण्यात न आलेली इतर माहिती सांगा तसेच किती प्रयुक्त ढोंगी आहेत हे शोधण्यास ही सांगितले. यातून मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

गट	प्रयुक्त	निदान
गट - 1	मनोरुग्णालयातील संशयी खिन्नमनस्कता विकृतीचे रुग्ण	फक्त 48% रुग्णांचे निदान मनोविक्षिप्त म्हणून केले
गट - 2	खिन्नमनस्कते विषयी खोट्या प्रतिक्रिया दिलेल्या ढोंगी व्यक्ती	46% ढोंगी प्रयुक्तांचे निदान मनोविक्षिप्त म्हणून
गट - 3	संशयी खिन्नमनस्कता विकृतीचे फक्त ध्वनिफीत ऐकलेल्या व्यक्ती	72% व्यक्तींचे मनोविक्षिप्त म्हणून निदान
गट - 4	सामान्य विद्यार्थी	24% सामान्य मुलांचे निदानही मनोविक्षिप्त म्हणून

या अभ्यासातील आश्चर्याची बाब म्हणजे यापैकी संशयी खिन्नमनस्कता विकृतीची ध्वनिफित ऐकलेल्या 72% व्यक्तींचे मनोविक्षिप्त म्हणून निदान तज्ञांनी केले होते. तर फक्त 48% खऱ्या मनोरुग्णांचे निदान मनोविक्षिप्त म्हणून केले होते. तर ते 46% ढोंगी प्रयुक्तांचे निदान मनोविक्षिप्त म्हणून करण्यात आले होते. याचबरोबर 24% सामान्य मुलांचे निदानही मनोविक्षिप्त म्हणून करणार आले होते. यावरून असे दिसून येते की, मनोविक्षिप्ततेचे मापन करण्यासाठी रोर्शा चाचणी विश्वसनीय ठरत नाही. यासंदर्भात निट्टर व विग्लियन यांनीही समान स्वरूपाची मते मांडली आहेत. थोडक्यात टीकाकारांच्या मते, पूर्वकथनात्मकदृष्ट्या रोर्शा चाचणी कमी विश्वसनीय व कमी यथार्थ दिसून येते.

पण याचबरोबर चाचणीच्या सकारात्मक बाजू मध्ये **एक्सनर यांच्या बहुविध गुणांकन पद्धती** बाबतचे पुरावे आशावादी दिसून येतात. कारण नुकत्याच मॅकग्राथ व त्यांच्या सहकार्यांनी (2005) केलेल्या अभ्यासातून असे दिसून येते की, व्यावहारिक जीवनात या संदर्भात कमी नियंत्रित वातावरणात ही गुणांकाबाबत रोर्शा चाचणी समाधानकारक दिसून येते. आणि हे सर्व अभ्यास संशोधनात्मक परिस्थितीवर आधारीत आहेत.

The prestigious society for personality द्वारा नियुक्त Blue Ribbon ही समिती सद्या रोर्शा चाचणी संदर्भातील वाद-विवादां विषय अभ्यास करीत आहे. या समितीने असे सुचवले आहे की, MMPI – 2 सारख्या स्विकाहार्य व प्रचलित चाचणीशी रोर्शा चाचणीची विश्वसनीयता व यथार्थता जुळत असल्याचे दिसून येते.

वरील संदर्भावरून रोर्शा चाचणी विषयी असणारे वादविवाद थोडेसे बाजूला होतात. पण काही ठिकाणी टीकाकारांनी काही त्रुटी ही सुचविल्या आहेत. जसे एक्सनर यांनी सुचविलेली बहुविध गुणांकन पद्धती ही कष्टप्रद व वेळखाऊ ठरते. ज्यामध्ये बराचसा वेळ जातो आणि गुणांकनासाठी प्रदीर्घ वर्षाच्या अनुभवाचीही आवश्यकता भासते. यासाठी काही प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात पण यामधून रोर्शा चाचणीची फक्त ओळखच होते असे म्हणावे लागेल. तसेच ही चाचणी खर्चिक व वेळखाऊ असल्यामुळे व्यावसायिक दृष्टिकोनातून सल्लार्थींना न परवडणारी ठरते. सुरुवातीस या चाचणीचे प्रशिक्षण द्यावे लागते. दुसऱ्या वेळेस याचे प्रमाणीकरण व शेवटी गुणांकन व विश्लेषण करावे लागते. त्यामुळे हे सर्व इतके महत्त्वाचे आहे का? असा प्रश्न परीक्षक व परीक्षणार्थींना पडतो. एकंदरीतच चिकित्सालयीन दृष्टीकोनातून मनोनिदानासाठी बनविण्यात आलेली एक वेगळी चाचणी म्हणून रोर्शा चाचणी ओळखली जाते पण काही त्रुटीही दिसून येतात.

2) रचनात्मक तंत्रे: चित्र अवबोधन चाचणी (Construction techniques: Thematic Apperception Test- TAT)

- **चाचणीचे वर्णन (Description)**

मोकळ्या कार्डवर काळ्या व पांढऱ्या शाईची चित्रे आणि छायाचित्रांची वेगवेगळी चित्रे असणाऱ्या एकूण 29 चित्रांचा (कार्ड्स) समावेश या चाचणीमध्ये होतो. यापैकी एक कार्ड मोकळे असून इतर कार्डावर एक किंवा अनेक व्यक्ती संदिग्ध कार्यांमध्ये गुंतल्याची चित्रे

आहेत. यातील काही कार्डस पुरुषांसाठी (Male-M), काही स्त्रियांसाठी (Female- F), काही मुलांसाठी (Boys- B), काही मुलींसाठी (Girls-G), तर काही कार्डस मुलांसाठी व प्रौढांसाठी एकत्रित (BM) वापरली जातात. यातील एकूण 20 कार्डस प्रत्येक परीक्षणार्थीच्या मापनासाठी वापरली जातात.

- **चाचणी प्रशासन (Administration)**

या चाचणीच्या प्रशासनामध्ये प्रत्येक कार्डावरील चित्रास अनुसरून परीक्षणार्थीस एक नाट्यमय कथा लिहिण्यास सांगितली जाते. यामध्ये, चित्रामध्ये प्रमुख भूमिकेत कोण आहे? त्या चित्रामधील चालू दृष्यामध्ये त्या क्षणी काय घडत आहे? चित्रातील पात्रांच्या भावना व विचार काय असतील आणि चित्रातील कथेत शेवटी नेमके काय घडणार आहे? इ. गोष्टींवर आधारित कथा लिहिण्यास परीक्षणार्थीस सांगितले जाते. नंतर गुणांकन व विश्लेषणाच्या दृष्टिकोनातून परीक्षक- परीक्षणार्थीने लिहलेल्या कथेवर आधारित शब्दश: कथा लिहितो.

हार्वर्ड मानसशास्त्रीय चिकित्सालयामध्ये हेनरी मरे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी TAT ही चाचणी विकसित केली (मॉर्गन आणि मरे, 1935 ; मरे, 1938). मरे यांनी सांगितलेल्या व्यक्तिमत्व सिद्धांतामधील गरजा आणि दबाव (Need & Press) यांचे मापन करण्याच्या दृष्टिकोनातून या चाचणीची रचना करण्यात आली होती. मरे च्या मते, गरजांमध्ये संवेदन, विचार, कृती तसेच व्यक्तीने समाधानतेच्या दिशेने केलेले वर्तन इ. घटकांचा समावेश होता. उदाहरणार्थ संपादनाची गरज, संलग्नता आणि प्रभुत्व ही गरजांची उदाहरणे आहेत. तर विरुद्धार्थी दबावामध्ये (ताण) व्यक्तीवर परिणाम करणाऱ्या वातावरणीय प्रासंगिक शक्तीचा समावेश होतो. दबावामध्ये अल्फा आणि बिटा दबावाचा समावेश होतो. यामध्ये अल्फा दबाव म्हणजे बाह्य शक्तीतील वस्तुनिष्ठ/ वास्तविक घटक. तर बिटा दबाव म्हणजे बाह्य शक्तीतील व्यक्तिनिष्ठ किंवा संवेदित घटक. परीक्षणार्थीने लिहिलेल्या कथांवर आधारित 36 प्रकारच्या गरजा आणि गरजांच्या विविध पैलूंचे स्पष्टीकरण करण्यासाठी मरे यांनी (1938, 1943) विस्तृत गुणांकन पद्धती विकसित केली.

- **गुणांकन व स्पष्टीकरण (Scoring and Interpretation)**

जशी मरे यांनी TAT चाचणी प्रकाशित केली, तर इतर चिकित्सकांनी या चाचणीसाठी पर्यायी गुणांकन पद्धती विकसित करण्यास सुरुवात केली (उदाहरणार्थ डाना ,1959; टॉमकिन्स, 1947). यामुळे अवलोकनाच्या स्वरूपात TAT च्या प्रशासन, गुणांकन, आणि स्पष्टीकरणाबाबतचे साहित्यही झपाट्याने वाढू लागले. परिणामत: 1950 च्या सुमारास TAT चे प्रशासन, गुणांकन आणि प्रशासनासाठी एकमेव अशी कोणती पद्धती दिसून आली नाही. ज्याचा परिणाम आजही दिसून येतो. प्रमाणित पद्धतीच्या अभावामुळे प्रत्येक परीक्षकांच्या सुचनांमध्ये तफावात दिसून येते. त्यामुळे TAT च्या वापरात अडचणी दिसून येतात.

TAT च्या सूचना देताना मरेने सांगितलेल्या दोन गोष्टींचा समावेश सूचनांमध्ये असावा. एक म्हणजे ही एक काल्पनिकतेची चाचणी आहे आणि दुसरे म्हणजे बुद्धीमतेचे एक स्वरूप आहे. वरील दोन गोष्टींचा समावेशासहित TAT साठी पुढील प्रमाणे सूचना देणे अपेक्षित आहे.

> मी तुम्हास काही चित्रे दाखवणार आहे. एकावेळी एक प्रमाणे; आणि तुमचे काम म्हणजे तुमच्या परीने प्रत्येक चित्रावर आधारित तुम्ही एक नाट्यमय कथा लिहायची आहे. सांगा चित्रामधील दाखवलेल्या प्रसंगामध्ये प्रमुख भूमिकेत कोण आहे, त्या क्षणाला काय घडत आहे याचे वर्णन करा, चित्रातील पात्रांचे विचार व भावना काय असतील; व यानंतर याचा परिणाम काय असेल ते सांगा. तुमच्या मनात जसे विचार येतील तसे व्यक्त करा, तुम्हाला समजेल का? तुमच्याकडे 10 चित्रांसाठी 50 मिनिटे आहेत. तुम्ही प्रत्येक चित्रास 5 मिनिटे वेळ देऊ शकता. हे आहे पहिले चित्र. (मरे, 1943)

सध्याचे चिकित्सक TAT च्या सूचना देताना कल्पना आणि बुद्धिमत्तेच्या महत्वावर कमी भर देतात. ज्याचा परिणाम परीक्षणार्थीद्वारे लिहिल्या जाणाऱ्या कथेच्या गुणवत्तेवर होऊ शकतो.

TAT च्या डझनच्या आसपास गुणांकन पद्धती उपलब्ध आहेत. पण परीक्षणार्थीने लिहिलेल्या कथांच्या गुणवत्तापूर्ण चिकित्सालयीन विश्लेषणावर TAT चे स्पष्टीकरण अवलंबून असते. मरेने सांगितलेला कथेतील नायक (Hero) हा गुणांकनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहे. कारण नायक हा परीक्षणार्थीच्या कथेतील मुख्य पात्र असतो. ज्याच्या माध्यमातून परीक्षणार्थीच्या स्वतःच्या गरजा, ध्यास आणि भावना व्यक्त करतो. याचबरोबर नायकाच्या माध्यमातून भावना, विचार आणि कृती नाकारले जाणे यातून परीक्षणार्थी मधील संघर्ष दिसून येतो.

बरेचसे परीक्षणार्थी कथेच्या माध्यमातून स्वतःच्या मनावर झालेले आघात नाकारण्याचा प्रयत्न करतात, काहीजण पुरुषांविषयीच्या कथा, शाळेतील ताणजन्य आघात इ. कथेमधून व्यक्त करतात. त्यामुळे बरेचसे चिकित्सक असा निष्कर्ष काढतात की, अशा परीक्षणार्थीच्या मानसिकतेवर आघात झालेला असतो आणि असे परीक्षणार्थी स्वतःच्या स्व-विध्वसंक आवेगांविरुद्ध लढत असतात. त्यामुळे अशा व्यक्तींसाठी मानसोपचार वापरणे फायदेशीर ठरते.

TAT चा आकार (विस्तृत) गुणांकन पद्धतीमुळे व स्पष्टीकरणामुळे व चाचणीची मनोमितीय उपयुक्तता तपासणे थोडेसे कठीण जाते. कथेमधील उल्लेखनीय पैलूंच्या आधारावर परीक्षक निष्कर्ष काढून त्याचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे यातील एक महत्त्वाची समस्या म्हणजे औपचारिकदृष्ट्या केलेल्या गुणांकाची चाचणी- पुनःचाचणी विश्वसनीयता अतिशय कमी ($r = 0.28$) दिसून येते (विन्टर आणि स्टीबर्ट, 1977). पण आश्चर्याची बाब म्हणजे TAT चा वापर करणाऱ्यापैकी 97% व्यक्ती या व्यक्तिनिष्ठ गुणांक पद्धतीचा वापर करतात. त्यामुळे थोडेफारच चिकित्सालयीन सरावकर्ते हे प्रमाणीत गुणांकन पद्धतीचा वापर करतात. (लिलीइनफील्ड व इतर., 2001). त्यामुळे प्रक्षेपण चाचण्यांवर झालेल्या संशोधनात्मक अभ्यासांचा याठिकाणी संदर्भ घेतल्यास असे दिसून येते की, अशा प्रकारच्या व्यक्तिनिष्ठ गुणांकन पद्धतीमुळे मानसिक अपसामान्यतत्त्वाचे अतिनिदान (Over diagnosis) होऊ शकते.

4.3 सामान्यत्वाचे मापन (ASSESSMENT OF NORMALITY)

सल्लार्थीच्या जीवनातील समस्या आणि मानसिक आजारांच्या लक्षणांचे मापन करण्यासाठी MMPI, रोर्शा आणि TAT सारख्या चाचण्यांचा वापर केला जातो. या चाचण्या चिकित्सालयीन वापरासाठी बनलेल्या असल्यामुळे या हेतूसाठी या चाचण्या मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात. रोर्शा आणि MMPI, व्यक्तिमत्व मापनापेक्षा चिकित्सालयीन निदानासाठी मोठ्या प्रमाणात वापरले जातात. रोर्शा सारखी चाचणी मनाचा एक्स-रे काढण्यासाठी बनलेली आहे. असे मत फ्रँक व त्यांचे सहकारी (1939) व्यक्त करतात. सध्या या चाचणीचा उपयोग DSM- IV च्या निकषामध्ये अचूकपणे न बसणाऱ्या पण मानसिक आजाराच्या लक्षणांनी युक्त असणाऱ्या रुग्णांचे निदान करण्यासाठी होतो.

पण एखाद्या सामान्य व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे मापन करावयाचे असल्यास चिकित्सालयीन दृष्टिकोनातून बनलेल्या चाचण्यांपेक्षा सामान्य वापराच्या दृष्टिकोनातून बनलेल्या चाचण्या या अधिक फायदेशीर ठरतात. कारण मानसशास्त्रीय मूल्यमापन हे प्रत्येक वेळी आजाराची लक्षणे, ताणाची पातळी, संरक्षण यंत्रणा असे अपसामान्यत्वाच्या मापनाच्या अनुषंगानेच होते असे नाही. त्यामुळे मानवी वर्तनाचे सामान्य स्तर स्पष्ट करण्यासाठी सामान्य वापरासाठी बनलेल्या मानसशास्त्रीय चाचण्याच उपयोगी पडतात. अशा काही चाचण्या पुढीलप्रमाणे:

अ) निओ व्यक्तिमत्व शोधिका सुधारीत (NEO Personality Inventory- Revised- NEO PI- R)

चिकित्सालयीन आणि सामान्य प्रौढ नमुन्यावर दशको झालेल्या घटक विश्लेषणात्मक संशोधनावर प्रस्तुत चाचणी आधारित आहे (कोस्टा आणि मॅक क्रे, 1992). ही चाचणी व्यक्तिमत्त्वाच्या पंचघटक प्रारूपावर आधारित असून दोन समरूप फॉर्म मध्ये उपलब्ध आहे. ज्यामध्ये पाच बिंदु घटकांसहित 240 कलमांचा समावेश होतो. यथार्थतेच्या दृष्टिकोनातून जादाच्या तीन कलमांचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे. याची NEO Five- Factor Inventory – (NEO FFI) ही लहान आवृत्ती देखील उपलब्ध आहे.

NEO PI- R मधील दोन फॉर्म पैकी S फॉर्म हा स्व-निवेदन फॉर्म आहे. तर R फॉर्म प्रयुक्ताच्या निरीक्षणासाठी आहे. (जसे चाचणी दरम्यान परीक्षणार्थींचे थांबणे). यातील प्रत्येक कलमास पूर्णपणे असहमत, असहमत, तटस्थ, सहमत आणि पूर्णपणे सहमत असे पाच पर्याय देण्यात आले आहेत. या कलमांद्वारे परीक्षणार्थी मधील भावनिक, आंतरवैयक्तिक, प्रायोगिक आणि अभिवृत्तीजन्य व प्रेरणात्मक पैलूंचे (परिवर्तकांचे) मापन होते.

या चाचणीमध्ये एकूण **पाच घटक (Domains)** असून प्रत्येक घटक **उप सहा छटांवर** (Facet) आधारित आहेत ते पुढीलप्रमाणे:

	NEO PI – R मधील मुख्य घटक व उपघटक (छटा)
1)	**चेतापदशीता/ नसविकृतता (Neuroticism –N).**
	1) चिंता (Anxiety-N1)
	2) राग वैरभाव (Angry Hostility –N2)
	3) अवसाद/ उदासिनता (Depression –N3)
	4) स्व – बोधावस्था (Self- Consciousness- N4)
	5) आवेगशिलता (Impulsiveness – N5)
	6) भेद्यता (Vulnerability –N6)
2)	**बहिर्मुखता (Extraversion – E)**
	1) प्रेमळपणा (Warmth –E1)
	2) समाजशीलता / संगतीप्रिय (Gregariousness –E2)
	3) आग्रहीपणा (Assertiveness –E3)
	4) कृतीप्रवण (Activity-E4)
	5) उत्तेजितपणा (Excitement seeking- E5)
	6) सकारात्मक भावना (Positive Emotions –E6)
3)	**अनुभवांचा मुक्त स्विकार (Openness to Experience –O)**
	1) कलपणारति (Fantasy –O1)
	2) सौदर्यदृष्टी (Aesthetics –O2)
	3) भावना (Feelings –O3)
	4) कृती (Action –O4)
	5)कल्पना (Ideas –O5)
	6) मूल्ये (Values –O6)
4)	**सहमतीदर्शकता (Agreeableness - A)**
	1) विश्वास (Trust –A1)
	2) सरळ स्वभावी (Straight Forwardness –A2)
	3) परोपकारी (Altruism – A3)
	4) मान्यता (Compliance –A4)
	5) सभ्यता (Modesty –A5)
	6) मृदु हृदयी/ हळव्या मनाचा (Tender- Mindedness – A6)
5)	**विचारपूर्वकता / सदसदविवेकबुद्धी (Conscientiousness – C)**
	1) क्षमता (Competence –C1)
	2) नीटनेटका (Order –C2)
	3) कर्तव्यतत्पर (Dutifulness –C3)
	4) संपादन ध्यास (Achievement striving –C4)
	5) स्वयंशिस्त (Self- Discipline- C5)
	6) चर्चा / विचारविनिमय (Deliberation –C6)

- **विश्वसनीयता (Reliability)**

या चाचणीची अंतर्गत सातत्य विश्वनीयता उत्कृष्ट दिसून आली आहे. ज्यामध्ये मूळ घटकांसाठीचा सहसंबंध गुणांक 0. 86 ते 0.83 च्या दरम्यान दिसून आला आहे. तर उपछटांसाठी 0.56 ते 0.90 च्या दरम्यान सहसंबंध गुणांक दिसून आला आहे. तीन ते सात वर्षाच्या दीर्घकालीन अभ्यासातून या चाचणीचा स्थिरता सहसंबंध गुणांक काढला असता तो 0. 51 ते 0 .83 च्या दरम्यान दिसून आला.

- **यथार्थता (Validity)**

इतर चाचण्या आणि तपासणी याद्यांशी तुलना करून या चाचणीची यथार्थता तपासली आहे. ज्यामध्ये इतर चाचण्यांशी स्वतंत्ररित्या व एकत्रीतरित्या समाधानकारक सहसंबंध या चाचणीचा दिसून आला आहे. तसेच मूळ पंच घटक प्रारूपाशी ही जुळती रचनात्मक यथार्थता दिसून आली आहे.

व्यक्तिमत्व मापनासाठी ही एक उत्कृष्ट चाचणी आहे. पण विशेषकरून संशोधन कार्यात ही चाचणी अधिक उपयुक्त ठरते. रूबेन्झर व त्याच्या सहकाऱ्यांनी (2000) अमेरिकन अध्यक्षांवर केलेल्या अभ्यासाचा याठिकाणी संदर्भ घेता येईल. ज्यामध्ये अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन ते 41 वे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश यांचा समावेश होता. ज्यांच्या व्यक्तिमत्व मापनासंदर्भात ही चाचणी यशस्वी ठरल्याचे दिसून आले आहे.

चिकित्सालयीन अपसामान्यत्वाचे मापन करण्याच्या दृष्टिकोनातून सुद्धा ही चाचणी विश्वसनीय ठरते. जसे क्लार्कीन व त्यांच्या सहकाऱ्यांना (1993) बॉर्डरलाइन व्यक्तिमत्व विकृतीच्या निदानासाठी ही चाचणी विश्वसनीय असल्याचे दिसून आले आहे. या रुग्णांनी चेतापदशीता या घटकावर उच्च गुणांक दर्शविला. प्रस्तुत विकृतीच्या रुग्णांबाबतचे हे निष्कर्ष इतर चिकित्सकांनाही एकमताने दिसून आले आहेत. अशाच प्रकारचे निष्कर्ष रॅनसन व त्यांच्या सहकाऱ्यांना (1998) अवधान - दोष अतिक्रियाशीलता (ADHD) विकृतीच्या रुग्णांबाबत ही दिसून आले आहेत. फक्त यथार्थतेच्या दृष्टिकोनातून या चाचणीमध्ये उणीव जाणवते. कारण फक्त तीन कलमांद्वारेच यथार्थता तपासली जाते.

शिक्षण आणि संशोधनात्मक हेतूने बनविण्यात आलेल्या अनेक वेबसाईटवर NEO PI – R शी समरुप असणाऱ्या अनेक पर्यायी चाचण्या उपलब्ध आहेत. ज्यांच्या आधारे स्व-मूल्यमापन करता येते. व्यवसायिक दृष्टिकोणातून बनलेल्या या चाचण्या NEO PI – R शी मिळत्या- जुळत्या असल्याने परीक्षणार्थीच्या व्यक्तिमत्वाचे अंदाजे भाकीत करण्यासाठी आणि संशोधनपर स्वरूपात माहिती पुरवण्यासाठी उपयुक्त ठरतात अशा अनेक वेबसाईट आहेत ज्यावर या पद्धतीच्या पर्यायी चाचण्या उपलब्ध होतात. ज्यांचा हेतू सर्वसामान्य वापरासाठी चाचण्या विकसित करणे, संशोधनात्मक निष्कर्षांचा प्रसार करणे तसेच मनोमितीय चाचण्यांच्या विकासासाठी एक संघटना म्हणून कार्य करणे आहे.

निओ व्यक्तिमत्व शोधिका - 3 (NEO PI- 3)

नुकतीच अलीकडे NEO PI – R च्या चाचणी निर्मात्यांनी या चाचणीची सुधारित आवृत्ती NEO PI – 3 बनविली आहे. ही चाचणी अधिक वाचनीय असल्याने बारा वर्षाच्या मुलांसाठी उपयुक्त आहे. मूळ चाचणीवरुन अतिशय काळजीपूर्वकपणे बनवलेली ही आवृत्ती आहे. मूळ चाचणीतील बरीचशी कलमे ही किशोरांच्या व प्रौढांच्या आकलनाच्या दृष्टिकोनातून कठीण होती. त्यामुळे मुळ चाचणी मधील 240 कलमांपैकी 30 कलमे अशी होती. ज्यातील काही शब्द समजण्यास कठीण होते. ज्यामध्ये लेखकांनी बदल केला. त्याचबरोबर काही उपचाचण्यांमधील (छटांमधील) 18 कलमे अशी होती ज्यांचा त्यांच्याशी निम्न सहसंबंध दिसून येत होता. अशा 18

चाचणी कलमांची पुनर्रचना याठिकाणी करण्यात आली आहे. त्यामुळे NEO PI – 3 ही मूळ चाचणीपेक्षा आंतरिकदृष्ट्या अधिक सातत्यपूर्ण व विश्वसनीय आणि मुळ पंच घटक प्रारूपाशी मिळती-जुळती दिसून आली आहे. एकंदरीत किशोरांच्या आणि महाविद्यालयीन सल्लार्थीच्या मापनाच्या दृष्टिकोनातून लेखकांनी या आवृत्तीमध्ये सुधारणा केली आहे.

ब) सोळा व्यक्तिमत्व घटक प्रश्नावली (Sixteen Personality Factor Questionnaire – 16 PF)

व्यक्तिमत्व मापनासाठी मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी व्यक्तिमत्व चाचणी म्हणून आर. बी. कॅटल यांच्या या चाचणीस ओळखले जाते. ही चाचणी सद्या A, B, C, D आणि E अशा पाच स्वतंत्र फॉर्म मध्ये उपलब्ध आहे. यामधील A, B, C आणि D या फॉर्म मध्ये प्रत्येक प्रश्नास एकूण तीन पर्याय दिले आहेत. ज्यापैकी एका पर्यायाची निवड परीक्षणार्थीस करावयाची आहे. या चाचणीतील काही उदाहरण कलमे पुढीलप्रमाणे:

1. मी खालील गोष्टींवर आधारित निर्णय घेतो/ घेते.

अ) भावना ब) भावना आणि तर्क क) तर्क.

2. खालीलपैकी कोणता घटक इतरांपेक्षा वेगळा आहे?

अ) मेणबत्ती ब) तारा क) प्रकाश दिवा.

3 अनोळख्या व्यक्तींसमोर बोलण्यात मला अडचणी येतात.

अ) होय ब) कधी-कधी क) नाही.

वरील फॉर्म्स मध्ये 105 ते 187 कलमांचा समावेश होतो. आणि मुख्यत्वे वाचन पातळीनुसार (तिसऱ्या इयत्तेपासून – सातव्या इयत्तेपर्यंत) या फॉर्मस मध्ये भिन्नता दिसून येते. ही चाचणी सोडविण्यासाठी वेळेचे बंधन नाही पण तरीही 30 - 60 मि. कालावधीत ही चाचणी पूर्ण होते.

या चाचणीमध्ये बुद्धिमत्तेच्या मापनाशी संबंधित काही कलमांचा ही समावेश आहे. कारण दीर्घकाळापासून मानसशास्त्रज्ञांना, व्यक्तिमत्व आणि बुद्धिमत्ता यामध्ये जवळचा संबंध असल्याचे दिसून आले आहे. तर काही व्यक्तींना या दोन संकल्पना वेगवेगळ्या आहेत असेही वाटते. त्यामुळे या दोन संकल्पना मधील अंतर कमी करण्याच्या दृष्टीने या दोन्हींचा कॅटलने एकाच चाचणीमध्ये समावेश केला आहे.

ही चाचणी शालेय प्रौढ मुले आणि प्रौढ यांच्या मापनाच्या अनुषंगाने बनविण्यात आली आहे. या चाचणीचे मानदंड 1970 च्या दशकातील नमुन्यावर आधारित आहेत. तथापी उच्च भिन्नता असणाऱ्या नमुन्यावर नुकताच या चाचणीचा फॉर्म E प्रकाशित करण्यात आला आहे. या नमुन्यात तुरुंगामधील कैदी, प्रतिकूल वातावरणात वाढलेल्या व्यक्ती, खिन्नमनस्कता विकृतीचे रुग्ण आणि शारीरिकदृष्ट्या पुनर्वसित सल्लार्थीचा यामध्ये समावेश होतो. मात्र तरीसुद्धा बरेचसे सरावकर्ते असे मानतात की, भावनिक बिघाड असणाऱ्या व्यक्तींपेक्षा सामान्य व्यक्तींच्या मापनासाठी ही चाचणी अधिक उपयुक्त आहे. तसेच अर्जेंटेरो (1989) यांना असे दिसून आले आहे की, आंतर-सांस्कृतिक उपयोजनाच्या दृष्टिकोनातूनही ही चाचणी उपयुक्त आहे.

ही चाचणी कॅटल यांच्या सोळा व्यक्तिमत्व घटक सिद्धांतावर आधारित आहे (कॅटेल व इतर., 1970). या सिद्धांतानुसार व्यक्तिमत्वाची मुख्य दोन गुणवैशिष्ट्ये दिसून येतात. एक **मूळ गुण (Source Traits)** आणि **दर्शनी गुण (Surface Traits)**. दर्शनी गुण हे ठळक व व्यक्तीच्या बाह्य वर्तनातून सहज प्रकट होणारी असतात. जसे, शांत राहणे, लाजाळूपणा व गर्दी न आवडणे इ. तर मूळ गुणवैशिष्ट्ये ही स्थिर स्वरूपाची बाह्य वर्तनातून सहसा प्रकट न होणारी व दर्शनी गुणांच्या मुळाशी असतात. जसे अंतर्मुखता (कॅटल,1950). या

चाचणीची रचना करते दरम्यान कॅटलने व्यक्तिमत्वाचे सोळा घटक/ मुळ गुण निर्धारित केले व त्यातूनच या चाचणीचे 16 व्यक्तिमत्व घटक प्रश्नावली असे नाव पडले.

या चाचणीमध्ये मूळ सोळा व्यक्तिमत्व घटकांचा समावेश होता. नंतर यामध्ये आणखीन चार घटकांची वाढ करण्यात आली. त्यामुळे एकूण 20 द्विधुवीय घटकांचा (चाचण्यांचा) यामध्ये समावेश होतो.

16 PF मधील सोळा व्यक्तिमत्व घटक आणि दुय्यम चार घटक

अ. क्र.	निम्न गुणांकांचे स्पष्टीकरण	घटक (Factors)	उच्च गुणांकांचे स्पष्टीकरण
1)	संकोचीत, अलिप्त, थंड, निष्ठुर.	उबदारपणा (Warmth)	उत्साही, मनमोकळा, लोकांना आवडणारा.
2)	मूर्तविचारी (निम्नबुद्धी)	बुद्धिमता (Intelligence)	अमूर्तविचारी (हुशार/बुद्धीमान)
3)	भावनिकदृष्ट्या अस्थिर, बदलणारा	भावनिक स्थिरता (Emotional Stability)	भावनिकदृष्ट्या स्थिर, शांत, परिपक्व.
4)	शरण जाणारा, सौम्य, तडजोड करणारा.	वर्चस्व (Dominance)	प्रभुत्ववादी, खंबीर, स्पर्धात्मक.
5)	गंभीर, जाणता, विचारी, मोजकेच बोलणारा.	आवेगशीलता (Impulsivity)	उत्साही, आनंदी, गैरसावध.
6)	कृतीनिश्चयी, नियम झुगारणारा.	अनुकारिता (Conformity)	अनुकारी, खंबीर, नितीनिष्ठ.
7)	लाजाळू, भित्रा, आत्मसंयमी.	भिडस्तपणा / धीट (Boldness)	भिडस्थ, निसंकोच, उत्स्फूर्त.
8)	कठोर मनाचा, स्वावलंबी. (आत्मविश्वासू)	संवेदनशीलता (Sensitivity)	हळव्या मनाचा, संवेदनशील.
9)	विश्वासू , जुळवून घेणारा.	संशयीपणा (Suspiciousness)	संशयी, धूर्त, अहंकार बाळगणारा.
10)	व्यावहारिक, पारंपारिक (रुढीबद्ध)	कल्पकता (Imagination)	अव्यवहारी, विसरभोळा, अपारंपारिक (अरुढीबद्ध).
11)	सरळ मनाचा (स्पष्ट), विश्वासू, नम्र.	धूर्तपणा (shrewdness)	हिशोबी, सफाईदार, सामाजिक दृष्ट्या सतर्क.
12)	स्व- विश्वासू, सुरक्षित, स्व-समाधानी.	असुरक्षितता (Insecurity)	स्वत:ला दोष देणारा, चिंतातुर.
13)	पुराणमतवादी, बदलांचा प्रतिकार करणारा,	अत्याधुनिकता (Radicalism)	उदार मनाचा, विश्लेषणात्मक, सर्जनशील.
14)	समुहाभिमुख, मनमिळाऊ, (संगतीप्रिय).	स्वयंपूर्णता (Self- Sufficiency)	ज्ञानसंपन्न, आत्मनिर्भर.
15)	बेशिस्त, चालढकल करणारा.	स्वयंशिस्त (Self- Discipline)	अनिवार्य वृत्तीचा सामाजिक दृष्ट्या दक्ष.
16)	ताणमुक्त, शांत, निम्न प्रेरणा असणारा.	तणाव (Tension)	विफल, प्रेरित, तणावपूर्ण.
17)	अंतर्मुखी	बहिर्मुखता (Extraversion- Q1)	बहिर्मुखी
18)	निम्न चिंता	चिंता (Anxiety –Q2)	उच्च चिंता
19)	संवेदनशील, भावनिक.	खंबीर (Tough Poise- Q3)	खंबीर
20)	अवलंबी	स्वतंत्रता (Independence –Q4)	स्वतंत्र

ही चाचणी करिअर मार्गदर्शन, व्यावसायिक मार्गदर्शनसाठी मोठ्या प्रमाणात वापरली जाते. या चाचणीचे प्रसिद्ध असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, वापराबाबत MMPI व MMPI -2 नंतर या चाचणीचा नंबर लागतो. या चाचणीची संगणकीकृत आवृत्ती ही उपलब्ध आहे. जिच्याद्वारे परीक्षणार्थींच्या व्यक्तिमत्वाचे मापन करता येते.

- **विश्वसनीयता (Reliability)**

या चाचणीतील एक उणीव म्हणजे यातील 16 घटक प्रत्येकी 10 ते 13 कलमांवर आधारित आहेत. यामुळे संपूर्ण चाचणीची लांबी कमी होते पण चाचणीच्या विश्वसनीयतेवर यांचा परिणाम होतो. या चाचणीची विश्वसनीयता द्वि-विभागीय आणि चाचणी पुनःचाचणी पद्धतीने तपासली आहे. यातील सोळा घटकांची द्वि-विभागीय विश्वसनीयता 0.50 पेक्षा कमी आली आहे तर मूळ चाचणी आणि या चाचणीचे इतर फॉर्मस यामध्ये 0.54 च्या आसपास विश्वसनीयता सहसंबंध गुणांक आला आहे. तसेच मूळ चाचणी आणि इतर फॉर्म मधील चाचणी- पुनःचाचणी सहसंबंध गुणांक 0.70 ते 0.80 च्या दरम्यान दिसून येतो. मात्र चाचणी प्रशासनाचा दिवस ओलांडताच जसे-जसे अंतर पडत जाते तसे-तसे हा सहसंबंध गुणांक घटतो.

- **यथार्थता (Validity)**

या चाचणीच्या यथार्थते संबंधीचे पुरावे, हे या चाचणीतील घटक व त्यामधील समाविष्ट कलमे यातील संबंध आणि घटकांमधील शुद्धता यावर झालेल्या प्रायोगिक संख्याशास्त्रीय अभ्यासांवर आधारित आहेत. यातील बरेचसे अभ्यास प्रेरणादायी स्वरूपाचे तर काही अभ्यास चाचणी मधून मिळणारे व्यावहारिक निष्कर्ष आणि मूळ सिद्धांत यांच्यातील संबंधावर आधारित आहेत.

जसे कॅटल आणि नेसलरोड (1967) यांनी 102 स्थिर विवाहित जोडपी आणि 37 अस्थिर विवाहित जोडप्यांमध्ये 16 PF चाचणीच्या व्यक्तीचित्राबाबत (Profile) दिसून येणाऱ्या समानतेविषयी अभ्यास केला. ज्यामधून त्यांना अस्थिर जोडप्यांपेक्षा स्थिर जोडप्यांच्या व्यक्ती चित्रांमध्ये अधिक समानता दिसून आली. म्हणजेच स्थिर जोडप्यांमधील पती आणि पत्नी या दोघांच्याही चाचणी गुणांकामध्ये धनात्मक सहसंबंध दिसून आला. तर अस्थिर जोडप्यांमध्ये ऋणात्मक संबंध दिसून आला. अस्थिर जोडप्यांमधील या चाचणीवरील गुणांक विरोधाभासी होते. उदाहरणार्थ उबदारपणा या घटकाबाबत या जोडप्यांमध्ये -0.51 असा ऋणात्मक सहसंबंध दिसून आला. ज्यावरून असे दिसून येते की त्यापैकी एक उत्साही तर दुसरा निरुत्साही दिसून येतो. असाच ऋणात्मक सहसंबंध इतर घटकांबाबतही या अस्थिर जोडप्यांमध्ये दिसून आला. यावरून असे दिसून येते की व्यक्तिमत्वातील असमानतेमुळे वैवाहिक जीवनातही अस्थिरता दिसून येते.

तसेच हर्टग आणि त्याचे सहकारी (2005) यांना असे दिसून आले आहे की, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलांना पुढील शिक्षणाचे (Specialization) पूर्वकथन करण्यासाठी ही चाचणी उपयुक्त ठरते.

याचबरोबर रॅझियर व त्याच्या सहकाऱ्यानी (2004) 386 प्रौढ स्वयंसेवकांचा नमुना वापरून 16 PF आणि NEO PI- R मध्ये सहसंबंधात्मक व समाश्रयणात्मक अभ्यास केला. ज्यामधून या दोन्ही चाचण्या व्यक्तिमत्वाच्या एकाच घटकाचे मापन करत असल्याचे दिसून आले. NEO PI- R मध्ये एकूण पाच घटक आहेत त्यापैकी सहमतीदर्शकता हा घटक वगळता इतर चार घटकांबाबत 16 PF चे निष्कर्ष जुळत असल्याचे दिसून आले आहेत. यावरून व्यावहारिक जीवनातील उपयोजनाबाबत या चाचणीचे निष्कर्ष अधिक अर्थपूर्ण आणि पूर्वकथनीय असल्याचे दिसून येतात.

संदर्भ (References)

Bar – On, R (2006). The Bar-On Model of Emotional-Social Intelligence, Consortium for Research on Emotional Intelligence in Organizations – Issues in Emotional Intelligence, https://www.researchgate.net/publication/6509274

Gregory, R, J (2015). Psychological Testing History, Principles, and Applications, Global Edition, Pearson Education Limited Edinburgh Gate Harlow Essex CM20 2JE England.